**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर; १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत प्रधानमंत्र्यांच्या संबोधनाने 'वंदे मातरम' गीतावरील चर्चेला सुरुवात

- गोवा इथल्या क्लबमधे लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी चार जणांना अटक

**आणि**

- छत्तीसगडमधे एक कोटीचं बक्षीस असलेल्या नक्षली नेत्यासह बारा नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरु झालं. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं आज ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यातले १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी ६ हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे ३ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी ३ हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी २ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. आयुष्मान भारतासाठी सव्वा ३ हजार कोटी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी २ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद सरकारनं यात केली आहे.

विधानसभेत तालिका अध्यक्ष म्हणून चैनसुख संचेती, समीर कुणावार, किशोर पाटील, सरोज अहिरे, राहुल पाटील, उत्तम जानकर आणि रामदास मसराम यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली.

काँग्रेस नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला.

यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज यावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता त्यावर वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

यानंतर विधानसभेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

विधानपरिषदेत तालिका अध्यक्ष म्हणून अमित गोरखे यांची निवड करण्यात आली. तसंच अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, सुनील शिंदे, कृपाल तुमाने यांची तालिका सदस्यपदी निवड झाल्याची घोषणा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, पणन मंत्री, ग्रामविकास मंत्री, कामगार मंत्री यांनी अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवले. त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या महाधिवक्तापदी ज्येष्ठ विधिज्ञ मिलिंद साठे यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. नागपूर इथं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेलाही मंत्रिमंडळानं मजुरी दिली. यामुळे आता शेत रस्ते तयार करण्यासाठी १०० टक्के यंत्रसामुग्रीचा वापर करता येणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६(४) मध्ये सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. त्यामुळे भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी अकृषिक कारणासाठी बँकांकडे गहाण ठेवताना आकारल्या जाणाऱ्या तारण शुल्काबाबतचा कायदेशीर पेच आता सुटणार आहे.

**<><><><><>**

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत नागपूर इथं सुरुवात झाली. शहीद जवानांच्या कुटुंबांना दिली जाणाऱी मदतीची रक्कम वाढवून एक कोटी केली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. सैन्यदलाच्या शौर्यामुळे देशाच्या सीमा सुरक्षित आहेत, जवानांच्या जीवनाचं मोल करता येत नाही, पण त्यांच्या कुटुंबीयांसाठी या मदतीची गरज असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

नागपूरच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचं नाव देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आज, संत जगनाडे महाराज यांच्या जयंतीदिनी हा नामांतर सोहळा होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर  विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू आणि डीजीसीएच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यानी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. ते मुंबईत आज वार्ताहर परिषदेत बोलत होते. इंडिगो कंपनीला नफा कमावून देण्यासाठी विमान वाहतूक मंत्रालयाने त्यांना नियमात सूट दिली असा आरोप चव्हाण यांनी केला. इंडिगोच्या मालकांनी लोकसभा निवडणुकीत भाजपाला ५६ कोटी रुपयांची देणगी दिली होती, त्यामुळेच त्यांना नियमांना बगल देण्याची मुभा दिली गेल्याचा आरोपही चव्हाण यांनी केला.

<><><><><>

वंदे मातरम हे गीत आपली उर्जा आणि प्रेरणा बनावं, देश आत्मनिर्भर बनावा आणि २०४७मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण व्हावं, या स्वप्नाचा पुनरुच्चार करण्याची संधी या गीताच्या दीडशेव्या वर्षपूर्तीने दिली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत वंदे मातरम गीतावरच्या चर्चेला सुरूवात करताना ते बोलत होते.

ज्या मंत्राने, जयघोषाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला उर्जा आणि प्रेरणा दिली होती, त्यागाचा आणि तपश्चर्येचा मार्ग दाखवला होता, त्या वंदे मातरम गीताचं स्मरण करणं हे आपलं सौभाग्य आहे. या गीताच्या दीडशेव्या वर्षपूर्तीचे आपण साक्षीदार बनत आहोत, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांसाठी वंदे मातरम हाच उर्जामंत्र होता असं मोदी म्हणाले….

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

**बंगालच्या** पवित्र भूमीने भारताला फक्त वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत नाही, तर देशाला राष्ट्रगीतही दिलं, असं प्रतिपादन काँग्रेसचे खासदार **गौरव गोगोई** यांनी या चर्चेदरम्यान केलं. प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणाद्वारे या चर्चेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करून दिल्ली आणि परिसरातलं प्रदूषण, पहलगाम हल्ला, लाल किल्ला बॉम्बस्फोट, इंडिगोची समस्या इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकारला लक्ष्य केलं.

वंदे मातरम हे गीत फक्त गाण्यासाठी नाही, आचरणात आणण्यासाठी आहे, या गीतानं सर्व भेद ओलांडून भारताला एकत्र आणलं, असं प्रतिपादन समाजवादी पक्षाचे **अखिलेश यादव** यांनी केलं. वंदे मातरमचा आत्मा समजून घेऊन देशाला एकजूट करून पुढे जावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

भारतातली बहुआयामी गरिबीची टक्केवारी २०२२-२३मध्ये ११ पूर्णांक २८ शतांश टक्क्यांपर्यंत कमी झाली असून २०१३-१४मध्ये हाच दर २९ पूर्णांक १७ शतांश टक्के होता, अशी माहिती केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत दिली.

**<><><><><>**

हवाई प्रवासाच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचं स्पष्टीकरण केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू यांनी आज राज्यसभेत दिलं.

**<><><><><>**

गोवा इथल्या एका क्लबमधे लागलेल्या आगीमधे २५ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी आज चार जणांना अटक केली आहे. यात अरपोरा नाईट क्लबच्या जनरल मॅनेजरचा समावेश आहे. क्लबच्या मालकासह मॅनेजर आणि आयोजकावर गुन्हा दाखल

झाल्यानंतर ही अटक करण्यात आली आहे. नाईटक्लबला २०१३ मधे व्यापार परवाना दिल्याप्रकरणी अरपोरा-नाओआ ग्रामपंचायतीच्या सरंपचालाही ताब्यात घेण्यात आलं आहे.

दरम्यान, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन वार्ताहर परिषदेत बोलताना दिलं आहे.

**<><><><><>**

नक्षली संघटनेच्या केंद्रीय कमिटीचा सदस्य रामाधर माज्जी याच्यासह बारा नक्षलवाद्यांनी छत्तीसगड पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केलं. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड विभागातल्या नक्षली चळवळीला यामुळे मोठा धक्का बसल्याचं मानलं जात आहे. रामाधर माज्जी याच्यावर एक कोटीचं इनाम होतं. एके ४७ रायफलसह रामाधरने पोलिसांसमोर शरणागती पत्करली.

**//<><><><><>//**